स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) क्र.3 , सांगली,जिल्हाधिकारी कार्यालय सांगली
दूरध्वनी क्रमांक 0233-2602002
Email-dycollslao3@gmail.com

वाचले: मा. जिलहाधिकारी सांगली यांचेकडील दि. 09/12/2021 रोजीची मंजूर टिपणी

क्र.उ.जि./भूसंपादन/आरआर-27 /2022

दि. 14/01/2022

# जाहिर नोटीस

मा. जिल्हाधिकारी सांगली यांचेकडील वरील वाचले मान्यतेस अधिन राहून, उपजिल्हाधिकारी भूसंपादन क्र.3 सांगली या कार्यालयास भूसंपादन विषयक कामकाजासाठी वेळोवेळी प्रत्यक्ष स्थळ पहाणी करणे आवश्यक असलेने तसेच मा. विभागीय आयुक्तस्तर तसेच शासनस्तरावर वेळोवेळी आयोजित होणा-या आढावा बैठकींसाठी देखील उपस्थित रहाणे अनिवार्य असलेमुळे चारचाकी वाहन आवश्यक आहे.

सदर बाब विचारात घेऊन मा. जिल्हाधिकारी सांगली यांनी दिले मान्यते अन्वये महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र. संकिर्ण-05/ 2017 /प्र.क्र.71/ अ-2 दि.03 नोव्हेंबर 2018 मधील निर्देशानुसार उपलब्ध असलेल्या वित्तीय मर्यादेत महाराष्ट्र शासन उद्योग व उर्जा व कामगार विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र. भांखस/2021/ प्र:क्र.8/उदयोग-4 दि.07 मे 2021 मधील तरतूदीस आधिन राहून खालील अटी व शर्तीची पुर्तता करत असलेल्या एस.यु.व्ही. संवर्गातील गुणवत्ताधारक वाहन भाडेतत्वार घेणेसाठी वाहन भाडे, इंधन खर्च, चालक मानधन व दुरूस्ती-देखाभालीसह सदर नोटीसीव्दारे दरपत्रक मागणी करणेत येत आहे.

सदर दरपत्रके सादर करणेसाठी केवळ कार्यालयीन कामकाजाचे दिवसांमध्ये दि.21/01/ 2022 रोजी सायंकाळी 6.15 या कार्यालयीन वेळेपर्यत मुदत देणेत येत आहे. सदर दरपत्रके ही केवळ नोंदणीकृत टपालाव्दारे अगर समक्ष वरील नेमले वेळेत स्विकारणेत येतील.

## वाहन दरपत्रक अटी व शर्ती

1) **सदर वाहन दरपत्रक मागणी ही केवळ दिनांक 01/01/2022 दि. 30/12/2022 करीता मान्य राहतील. या कालावधीमध्ये दरात कोणत्याही कारणास्तव बदल होणार नाही.**
2) दि. 01/01/2015 व त्या पुढील बनावटीचे वाहन असणे बंधनकारक आहे.
3) मुंबई मोटार वाहन कायद्याप्रमाणे वाहनाच्या सर्व प्रकारच्या कराची रक्कम भरलेली असावी.
4) वाहनाच्या थर्डपार्टीसह पूर्ण विमा उतरविलेला असावा.
5) वाहन पुरवठा धारकाने नियमानुसार वेळोवेळी पी.यु.सी. वैध प्रमाणपत्र सादर करावे.
6) वाहनाचा सर्व कर भरणा केला असलेबाबत व आवश्यक परवाने अद्यावत असलेबाबतचे संबंधीत कागदपत्रे नेहमी वाहन चालकासोबत असणे आवश्यक आहे.
7) वाहन चालकाजवळ वाहन चालविण्यासाठी प्रचलित कायद्यानुसार वैध अनुज्ञप्ती असावी.
8) कार्यालयाने मागणी केलेस वाहन चालकांच्या एकंदरीत वर्तणूक व चारित्र्याबाबतचे प्रमाणपत्र प्राप्त करून देण्याची जबाबदारी वाहन मालकावर राहील.
9) वाहन 24 (चोवीस) तास कार्यालयासाठी असेल, त्यासाठी वाहन चालकाला कोणताही अतिरिक्त भत्ता दिला जाणार नाही.

Scanned with CamScanner

10) वाहन पुरवठादाराने अटी व शर्ती प्रमाणे वाहन न पुरविल्यास किंवा त्या नंतर अन्य कोणत्याही अटी अथवा शर्तीचा भंग केल्यास संबंधीत वाहन धारकास कोणतीही आगावू सूचना न देता करार रद्द करण्याचा अधिकार उपजिल्हाधिकारी भूसंपादन क्र. 3 सांगली यांनी राखून ठेवला आहे. वाहन कर्तव्यावर असताना नादुरूस्त / खराब झाल्यास त्वरील बदली वाहन पुरविण्याची व्यवस्था वाहन पुरवठादाराने करावी लागेल.

11) मागणी केलेले दरपत्रक हे केवळ तुलनात्मक निरीक्षणासाठी मागणी करणेत येत आहेत. दाखल केलेल्या दरपत्रका आधारे कोणीही पुरवठा धारक सदर प्रक्रियेवर हक्क सांगू शकत नाही.

12) मागणी केलेल्या दरपत्रकामधील नमूद वाहन हे कार्यालयास आवश्यक असलेले निकष पुर्ण करीत असेल तरच सदर वाहनाचे दरपत्रक हे पुढील प्रक्रियेसाठी विचारार्थ घेणेत येईल.

13) सदर दरपत्रकाबाबत निर्णय घेणेचे सर्वाधिकार हे गठित समितीकडे असतील. दरपत्रक प्रक्रिये पासून पुरवठा आदेशापर्यंत कोणत्याही टप्प्यावर समितीस सदर वाहनाचेबाबतीत कोणतीही साशंकता वाटलेस सदर दरपत्रक विचारात घेतले जाणार नाही.

14) अंतिमत: निश्चित होणारे वाहनाने वरील नमूद निकष पुर्ण न केलेस सदर वाहनाचा करार हा नेमले मुदतीमध्ये कोणतीही आगाऊ सुचना न देता तात्काळ रदद करणेत येईल, याचे सर्वाधिकार हे उपजिल्हाधिकारी भूसंपादन क्र.3 सांगली यांचेकडे राहतील.

(किरण कुलकर्णी)
उपजिल्हाधिकारी
भूसंपादन क्र.3 सांगली

प्रति,

सर्व संबंधित पुरवठादार

प्रत, माहितीस्तव सादर.

1.मा.जिलहाधिकारी कार्यालय, सांगली (समन्वय शाखा)
2.महसूल व वन विभाग, कार्यासन ई-8(महसूल उपविभाग) मंत्रालय मुंबई.
3.कार्यासन अ-2 (भूसंपादन कक्ष) मंत्रालय मुंबई.

Scanned with CamScanner